**<u>प्रतिवादीचे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ पी.जी.आहेर यांचे मार्फत सुरु.</u>**

५. तुळशीराम मगर यांनी बँकेकडे लॉकर भाड्याने घेतले होते. मी सदर लॉकर भाड्याने घेतले बाबतचे इंडेक्स कार्ड, भाडे करारनामा तसेच सेफ उघडल्याबाबतचे रजिस्टरचे पानाचे प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. (सदर दस्त उभयतांनी मान्य केल्यामुळे सदर दस्तास **नि.क्र. ३४ ते ३७** देण्यात आला.)

६. हे म्हणणे खरे आहे की इंडेक्स कार्ड मध्ये अर्जदार तुळशीराम मगर यांचे मृत्युनंतर त्यांचे सेफ लॉकर त्यांची पत्नी यमुनाबाई तुळशीराम मगर यांनी उघडावे असे नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की तसे अधिकार सेफ लॉकर धारक तुळशीराम यांनी त्यांचे पत्नी यमुनाबाई यांना अधिकारपत्राद्वारे दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की तुळशीराम यांनी लॉकर घेतलेबाबत भाडेकरारनामाही स्टॅम्पवर करुन दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की बँकेचे नियमाप्रमाणे सेफ लॉकर धारकाचे मृत्युनंतर त्याचे नॉमिनीला लॉकर उघडण्याचे संपुर्ण अधिकार प्राप्त होतात. हे म्हणणे खरे आहे की यमुनाबाई यांनी मयत तुळशीराम यांचे लॉकर उघडण्याकरिता चावी घेऊन येवुन बँकेकडे विनंती केली होती.
**प्रश्न -** तुम्ही यमुनाबाई यांना लॉकर उघडु दिले नाही?
**उत्तर -** त्यांचा मुलगा ज्ञानदेव यांचा लेखी आक्षेप असल्यामुळे आम्ही लॉकर उघडु दिले नाही.
ज्ञानदेव यांनी लॉकर त्यांचे व सर्वांचे समक्ष उघडावे ते परस्पर उघडू नये असा आक्षेप घेतला होता. ज्ञानदेव यांचे आक्षेपास आम्ही उत्तर देऊन योग्य तो आदेश न्यायालयाकडुन घेऊन येणे बाबत त्यांना कळवले होते. ज्ञानदेव यांनी अद्यापपर्यंत आदेश आणलेला नाही. यमुनाबाई यांनी लॉकर उघडणेस आमचा आक्षेप असण्याचे कारण म्हणजे त्यास त्यांचे मुलाने आक्षेप घेतला आहे. लॉकरचे संदर्भात हरकत आल्यास व ती हरकत निकाली न झाल्यास किती काळ लॉकर उघडता येत नाही ते मला सांगता येत नाही.
**प्रश्न -** सदर प्रकरणातील लॉकर यमुनाबाई यांना उघडण्यास तुमचा आक्षेप नाही?
**उत्तर -** न्यायालयाचा आदेश असल्यास सदर लॉकर उघडण्यास आमचा आक्षेप नाही.
हे म्हणणे खरे आहे की यमुनाबाई यांनी लॉकर उघडु दिले नाही म्हणुन आम्हाला नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे नाही की बँक बेकायदेशीररित्या यमुनाबाई यांना त्यांचे पतीचे लॉकर उघडण्यास परावृत्त करत आहेत.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

PANKAJ RAMDAS PHULARI
Digitally signed by PANKAJ RAMDAS PHULARI
Date: 2026.01.30 17:43:39 +0530

**(पंकज रा. फुलारी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर., राहाता.

राहाता
दिनांक –३०.०१.२०२६